**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार, दिनांक २८ सप्टेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **महाराष्ट्रात निष्पक्ष आणि निर्भय निवडणुका पार पाडण्यासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज: मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांचे मुंबईत प्रतिपादन.**
2. **पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या, २९ सप्टेंबररोजी आकाशवाणीवरच्या 'मन की बात' या कार्यक्रमातून देश-विदेशातल्या नागरिकांशी साधणार संवाद.**
3. **ज्येष्ठ नागरिकांसाठीच्या तीर्थदर्शन योजनेचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते राज्यस्तरीय प्रारंभ.**
4. **नागपुरातील ऑक्सिजन बर्ड पार्कच्या माध्यमातून नागरिकांना परिसंस्था आणि पर्यावरणाचे महत्त्व कळेल-केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे ऑक्सिजन बर्ड पार्कच्या उद्घाटनप्रसंगी प्रतिपादन.**

****

निवडणूक आयोग पत्रकार परिषद

राज्यातल्या आगामी विधानसभा निवडणुका निष्पक्ष आणि निर्भय वातावरणात पाडण्यासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज असुन अधिकाधिक मतदारांनाही सहभागी व्हावं असं आवाहन मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी आज केलं. केंद्रीय निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतल्यानंतर मुंबईत वार्ताहर परिषद घेतली त्यावेळी ते बोलत होते. राज्यामध्ये साडेनऊ कोटी मतदार हे 288 मतदार संघात असून सुमारे एक लाखाच्या वर मतदान केंद्रे या निवडणुकीत असतील. काही शहरी भागात नक्षलग्रस्त भागाच्या तुलनेत ही कमी मतदान होत असल्याने शहरी भागातील मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी नव मतदार तसेच इतर मतदारांना मतदानाचे कर्तव्य पार पाडण्यासाठी व्यापक मतदार जागृती मोहीम राबविण्यात येणार असल्याचे राजीव कुमार यांनी सांगितलं. शहरी भागातल्या जवळपास १०० टक्के आणि ग्रामीण भागातल्या ५० टक्के मतदान केंद्रावर वेब कास्टींगची सुविधा दिली जाणार आहे. शेजारील राज्यातून अवैधरीत्या होणारी रोख रक्कम, अमली पदार्थ, मद्य आणि इतर वस्तूंच्या वाहतुकीवर लक्ष ठेवण्यासाठी ३२२ चेक पोस्ट निर्माण करण्याचे आदेश दिल्याची माहिती त्यांनी दिली. निवडणुकीतील गैरप्रकारावर नियंत्रण ठेवण्यासाठी सी विजील सारख्या मोबाईल ॲपची देखील माहिती त्यांनी याप्रसंगी दिली.

मन की बात

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या, २९ सप्टेंबर रोजी आकाशवाणीवर 'मन की बात'या कार्यक्रमातून देशविदेशातल्या नागरिकांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा ११४ वा भाग असेल. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर, आकाशवाणी वृत्त संकेतस्थळ तसंच न्यूज ऑन एआयआर या ॲपवर प्रसारित केला जाईल.

स्वच्छता ही सेवा

मराठी चित्रपट तसेच मराठी मालिका आणि सिनेमा मध्ये महत्वपूर्ण भुमीका बजावणारे नागपूरचे प्रसिद्ध अभिनेते, लेखक आणि दिग्दर्शक देवेंद्र दोडके यांनी 'स्वच्छता ही सेवा' या अभियानाअंतर्गत नागरिकांना स्वच्छतेचे महत्व समजावून सांगितले आहे.

***स्वच्छता हि एक सेवा आहे. याच अनुषंगानं आपण आपलं आयुष्यपण जगणं गरजेचं असते. सर्व प्रथम स्वच्छता हि आपल्या घरापासून आपण करायला पाहिजे आपलं घरच नव्हे आपला जिथे जिथे वावर असतो शाळा असेल, ऑफिस असेल अजून कुठलं प्रांगण असेल, प्रत्येक गोष्ट स्वच्छ असेल तर आपलं आरोग्य देखील उत्तम राहू शकेल पण अस्वच्छतामुळे अनेक आजार आपल्याला होत असतात, त्याचा प्रसार होत असतो आणि अनेक लोकांना फेस करावं लागत म्हणून आजपासून आपण करूया स्वच्छता हि आपली सेवा आहे आणि ती सेवा आपण नेहमी करत राहू, आपल घर, आपला देश, स्वच्छ ठेऊ.***

प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम

दुर्गम अतिदूर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी बांधवांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियानाला केंद्र सरकारने हिरवा कंदील दाखविला आहे. त्यामुळे देशातील ६३ हजार तर महाराष्ट्रातील ४ हजार ९७५ आदिवासी गावांचा कायापालट होणार आहे. या माध्यमातून राज्यामधील ३२ जिल्ह्यांतील १२ लाख ८७ हजार ७०२ आदिवासी बांधवाचे सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरण केले जाणार आहे. या अभियानासाठी आवश्यक निधी केंद्र आणि राज्य सरकारकडून उपलब्ध होणार आहे. या अंतर्गत पक्की घरे, ग्रामीण भागात रस्ते, प्रत्येक घरात शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय, सर्व घरांमध्ये वीज जोडणी, मोबाईल मेडिकल युनिटची स्थापना, आयुष्मान कार्ड, एलपीजी कनेक्शन इत्यादी सुविधा मिळणार आहेत. यात विदर्भातील अकोला जिल्ह्यातील 43, अमरावती इथल्या 321, भंडारा-14, बुलढाणा -43, चंद्रपूर-167, गडचिरोली-411, गोंदिया-104, नागपूर-58, वर्धा-72, वाशीम-71 तर यवतमाळ जिल्ह्यातील 366 गावांचा समावेश राहणार आहे.

मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज कोल्हापुरातून मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेचा राज्यस्तरीय शुभारंभ करण्यात आला. मुख्यमंत्र्यांनी दूरदृश्य प्रणालीमार्फत या योजनेतील पहिल्या कोल्हापूर ते अयोध्या या रेल्वेगाडीला हिरवा झेंडा दाखवला. यावेळी पालकमंत्री हसन मुश्रीफ प्रत्यक्ष उपस्थित होते. या पहिल्या रेल्वेगाडीतून ८०० ज्येष्ठ नागरिक रवाना झाले असून, आपली वडीलधारी मंडळी ही आपली जबाबदारी असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. या योजनेच्या माध्यमातून ६० वर्षावरील सर्व धर्मीय ज्येष्ठांना विविध ठिकाणी तीर्थयात्रा घडवण्यात येणार आहे. यासाठी जिल्हास्तरावर समिती स्थापन केली आहे. निवड झालेल्या लाभार्थ्यांचा आपण प्रवास, निवास, भोजन खर्च शासनाद्वारे करण्यात येईल. भारतातील ७३ आणि आपल्या राज्यातील ६६ तीर्थक्षेत्रांचा योजनेमध्ये समावेश केला आहे.

ऑक्सिजन पार्क

नागपुरातील ऑक्सिजन बर्ड पार्कच्या माध्यमातून नागरिकांना परिसंस्था आणि पर्यावरणाचे महत्त्व कळेल असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज केले. नागपूरच्या वर्धा रोड वरील जामठा येथे नागपूर - हैदराबाद रोडवरील ऑक्सिजन बर्ड पार्कचे उद्घाटन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाचे सचिव अनुराग जैन, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अध्यक्ष संतोष कुमार यादव,रामटेकचे खासदार शामकुमार बर्वे प्रामुख्याने उपस्थित होते. या बर्ड पार्कचे महत्त्व सांगताना गडकरी म्हणाले की, बर्ड पार्क मध्ये कार्बन डाय-ऑक्साइड शोषला जात असून ऑक्सिजन निर्मिती होते. पार्कमध्ये असणाऱ्या तलावात सध्या बदक आणि इतर पक्षी आहेत परंतु येथे फळझाडांची लागवड केल्याने येथे अनेक स्थलांतरित पक्षी सुद्धा येतील. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाद्वारे रस्ते निर्मिती सोबतच अनेक पर्यावरण संवर्धनाचे पुढाकार घेतले जात असल्याची त्यांनी माहिती दिली .यामध्ये वणी -वरोरा रोडवर सुमारे 80 किलोमीटर रस्त्यावर बांबूचे पर्यावरण पूरक क्रॅश बॅरियरची बांधणी, स्टील ऐवजी उड्डाणपुलाच्या बांधकामांमध्ये ग्लास फायबरचा वापर, रस्ते निर्मितीमध्ये मुनिसिपल वेस्टचा वापर, रस्ते निर्मितीसाठी तलाव खोलीकरणातून मिळणारी मातीचा वापर आणि त्या माध्यमातून अकोला, बुलढाणा, वाशिम या जिल्ह्यामध्ये जलसंवर्धनासाठी तलावाचीही निर्मिती यासारख्या उपक्रमांचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'एक पेड मा के नाम' अंतर्गत वृक्षारोपण करण्यासाठी आवाहन केले होते याच उपक्रमांतर्गत नितीन गडकरी यांनी या बर्ड पार्क मध्ये वडाच्या वृक्षाचे रोपण करून या अभियाना अंतर्गत लोकांनी रोपटे लावावे असे आवाहन केले. 2.5 हेक्टर जागेसह एकूण 8.23 हेक्टर क्षेत्रात हे उद्यान उभारले गेले आहे. पक्ष्यांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासाची सोय उपलब्ध व्हावी आणि त्याचबरोबरीने स्थानिक नागरिक तसेच पर्यटकांसाठीही दिलासा देणारे नैसर्गिक ठिकाण उपलब्ध होईल अशा रितीनेच हे उद्यान विकसित केले गेले आहे. या उद्यानामध्ये फुडकोर्ट तसेच जल संवर्धनाकरिता 30 वॉटर रिचार्ज पीटस् सुद्धा आहेत.

गडकरी सीआयआय

नवीन तंत्रज्ञानाचा शोध घेऊन भविष्यातील विकासाचा वेध घेणारे उद्योग उभारणे आवश्यक असून त्याचे नियोजन उद्योजकांनी करावे आणि फक्त संपत्ती निर्माण करण्याऐवजी या क्षेत्रातील युवकांना रोजगार मिळेल या दिशेने पुढाकार घेण्याच आवाहन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपूर येथे केले .कॉन्फिडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री सीआयआयच्या वतीने नागपूरच्या सेंटर पॉइंट हॉटेल येथे आज एक दिवसीय सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग- एमएसएमई परिषद आणि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या एक दिवसीय परिषदेला संबोधित करताना ते बोलत होते. ग्रामीण भागातील विकासासाठी कृषी आणि कृषी माल प्रक्रिया उद्योग वाढणे आवश्यक आहे असे गडकरी यांनी यावेळी सांगितलं. नागपुरात होत असलेल्या मदर डेअरी प्रकल्पात 15 लाख दूध संकलन प्रति दिवस अपेक्षित आहे या प्रकल्पाचा सामाजिक आणि आर्थिक परिणाम संपूर्ण

विदर्भावर पडेल असेही त्यांनी स्पष्ट केले. याप्रसंगी सीआयआय महाराष्ट्राचे संयोजक राहुल दीक्षित यांनी महाराष्ट्रातील जिल्हयांचे औद्योगिक महत्त्व प्रास्ताविकात स्पष्ट केले.

संजय राठोड

महिला गटांना त्यांचा व्यवसाय वाढविण्यासाठी ई-रिक्षासह उत्पादीत मालाला तालुका स्तरावर हक्काची जागा उपलब्ध करुन देण्यात येत आहे, असे यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड यांनी आज सांगितले.दारव्हा येथे खनिज विकास निधी व अनुसूचित जाती उपयोजनेतून महिला आर्थिक विकास महामंडळाच्यावतीने पालकमंत्र्यांच्याहस्ते 44 गटांना तेजस्विनी कृषि वाहतूक ई-रिक्षाचे वितरण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. महिला गट सुरुवातीस पारंपरिक वस्तू, मालाची निर्मिती करत होते. आता बाजारपेठेला आकर्षित करणाऱ्या वस्तूंची निर्मिती केली जात आहे. त्यामुळे जिल्हयाच्या ठिकाणासह दारव्हा, दिग्रस, नेर येथे तालुकास्तरावर महिलांना विक्रिसाठी स्वतंत्र जागा देण्याचे नियोजन आपण केले आहे. माविम व उमेदला प्रत्येकी 25 याप्रमाणे 50 गाळे पगडी शिवाय नाममात्र दराने उपलब्ध होतील, असे राठोड यांनी सांगितले.

हवामान

विदर्भाच्या पूर्व भागातील नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, आणि पश्चिम भागातील अमरावती, अकोला आणि बुलढाणा या जिल्हयात आज वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जरी करण्यात आला आहे. आज सकाळ पासून नागपुरात अधून मधून ढगाळ वातावरण आहे. आगामी काही तासात, विदर्भातील अकोला, अमरावती, वर्धा आणि नागपूर जिल्हयांमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलका पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. अमरावती जिल्हयात गेल्या २४ तासांत सरासरी २४.१ मिली पावसाची नोंद झाली. यामध्ये तीन महसूल मंडळांत अतिवृष्टी झाली. शिवाय, सार्वत्रिक पावसाची नोंद झाली असली तरी तीन तालुक्यांत दमदार पाऊस झालेला आहे. या पावसाने पिकांना फायदा होण्याऐवजी नुकसान होत असल्याचे शेतकऱ्यांची माहिती आहे.

*****